

# प्रकरण पहिले

# स्त्रीवादी साहित्य संकल्पना आणि स्वरूप

# प्रकरण पहिले

# स्त्रीवादी साहित्य संकल्पना आणि स्वरूप

## प्रास्ताविक:

पारंपरिक समाजव्यवस्थेत स्त्रीला असलेल्या स्थानाचा विचार करता असे दिसते की, पुरूषप्रधान संस्कृतीने, स्त्रीचे विविध पातळ्यांवर शोषण केले आहे. परंपरेने तिला 'अबला' हे विशेषण लावले आहे. 'चूल आणि मूल' हेच तिचे आयुष्यभराचे कार्यक्षेत्र. तिच्याकडे पाहत असताना न्यूनत्वाच्या दृष्टिकोणातून पाहिले आहे. 'पुरूषाशिवाय तिला पूर्णत्व येऊच शकत नाही' हे तिच्या मनावर वारंवार बिंबवले गेले. यासाठी पुरूषप्रधान संस्कृतीने धार्मिक ग्रंथांचा आधार घेतला. त्याचे लेखनही पुरूषांनी त्यांच्या सोयीप्रमाणेच केले. त्यात विविध युक्त्या वापरण्यात आल्या. धार्मिक ग्रंथांमध्ये स्त्रीचे चित्रण सहनशील, सोशिक, ममतेचा सागर अशारितीने केले गेले. पुरूषप्रधान संस्कृतीच्या जोखडात स्त्री दबतच गेली आणि स्वत:चा आवाज तिचे स्वतंत्र अस्तित्व हरवून बसली. आपण जे त्यागाचे, कष्टाचे जीवन जगत आहोत हेच आपले खरे जीवन आहे. या निर्णयाप्रत तिला आणले गेले. स्त्रीच्या अगतिकतेचे एक अबला म्हणून समाजातील हेच स्थान लक्षात घेऊन स्त्रीवादाचा विचार करू लागले तर सध्याच्या परिस्थितीत यात बदल होत असल्याचे दिसते.

औद्योगिक क्रांती ही जागतिक इतिहासातील एक महत्त्वाची घटना आहे. विज्ञानातील विविध शोधांची मालिका चालू झाली आणि त्याचा परिणाम जीवनाच्या विविध क्षेत्रांवर पडू लागला. जीवनाच्या सर्वच क्षेत्रांत परिवर्तनाचे वारे वाहू लागले. याच काळात आणखी एक महत्त्वाची घटना घडली आणि ती

म्हणजे फ्रेंच राज्यक्रांती. 'स्वातंत्र्य-समता आणि बंधुता' ही महान मूल्य तिने जगाला दिली व परिवर्तनाच्या पहाटेचा उदय झाला. हा मानवी स्वातंत्र्याचा जाहिरनामा होता. 'माणूस हा जन्मापासूनच स्वतंत्र असतो' त्याला बळाच्या जोरावर कोणीही आपला गुलाम म्हणून ठेऊ शकत नाही. या विचाराने प्रेरित होऊन पारतंत्र्यात खितपत पडलेल्या विविध देशांतील स्वतंत्र चळवळींनी जोर धरला. आतापर्यंत गुलामगिरीच्या बेड्यात बंदिस्त असलेल्या दुर्बल घटकांची अस्मिता जागी झाली. याला स्त्रियाही अपवाद नव्हत्या आणि याच काळात स्त्रियांच्या चळवळींचा उदय झाला. यातूनच 'स्त्रीवाद' नावाची विचारसरणी आकाराला येऊ लागली. स्त्रीवादाने अखिल स्त्री-जातीच्या मुक्तीचा जाहीरनामा आणला. हजारो वर्षांच्या गुलामगिरीला धक्के दिले जाऊ लागले व ती एक राजकीय विचारप्रणाली बनली.

कोणत्याही चळवळीची यशस्वीता तिच्या वैचारिक परिपक्वतेवर अवलंबून असते. तिचा वैचारिक पाया जर सकस आणि स्पष्ट असेल तर ती चळवळ यशस्वी होते. स्त्रीवादाला ही एक सकस आणि स्पष्ट अशी वैचारिक बैठक आहे. तिच्या विकासाचा इतिहास आहे. 'स्त्रीवाद' या विचारसरणीचा उदय हा स्त्रियांच्या चळवळीतून झाला.

सूर्य पूर्वेला उगवत असला तरीही विज्ञानाचा आणि आधुनिक विचारांचा उदय हा पश्चिमेला होत आला आहे. 'स्त्रीवाद' या संकल्पनेचा उदय पाश्चिमात्य देशात झाला. असे असले तरीही बदलत्या काळानुसार जगातील विविध राष्ट्रांमधून स्त्रीवाद उत्तरोत्तर विकसित होऊ लागल्याचे दिसते.

प्रस्तुत प्रकरणात स्त्रीवाद म्हणजे काय ? स्त्रीवादाचा उदय आणि विकास, स्त्रीवादी साहित्य संकल्पना आणि स्वरूप, स्त्रीवादी चळवळीपुढील आव्हाने आणि स्त्रीवादी विचारसरणीच्या मर्यादा यांचा ओझरता परामर्श घेण्याचा प्रयत्न केला आहे.

## १.१ 'स्त्रीवाद' म्हणजे काय ?

'स्त्रीवाद' ही एक व्यापक संकल्पना आहे. स्त्रीवादाचा विकास हा स्त्रियांचे हक्क व त्यांच्यावरील अन्याया, अत्याचार यांना विरोध करणाऱ्या चळवळीतून झाला आहे. म्हणून 'स्त्रीवाद' ही संकल्पना पुस्तकी नसून जीवनातील प्रत्यक्ष घटनांचा तिला आधार आहे. ती एक राजकीय विचारप्रणाली आहे. १९६० नंतर स्त्रीवादी चळवळींचे स्वरूप स्पष्ट करताना डॉ. मंगला वरखेडे म्हणतात, ''पुरूषप्रधान समाजव्यवस्थेत स्त्रियांना मिळालेल्या दुय्यम स्थानाचा प्रतिवाद करणे आणि सामाजिक, राजकीय व आर्थिक सत्तास्थानात पुरूषांच्या बरोबरीने स्थान प्राप्त होण्यासाठीची चळवळ हे स्त्रीवादी चळवळीचे स्वरूप आहे.''[१]

समाजव्यवस्थेत पुरूषाकडे समाजातील एक महत्त्वाचा आणि प्रतिष्ठेचा घटक म्हणून पाहिले जाते. तर 'स्त्री'कडे मात्र न्यूनतावादी व दुय्यम दृष्टिकोणातून पाहिले जाते. तिची कार्यक्षेत्रे ही परंपरेने नेमून दिलेली असतात. त्या व्यतिरिक्त कोणत्याही क्षेत्रात तिने हस्तक्षेप करू नये असा एक अलिखित नियम असतो. ती परंपरेने नेमून दिलेली कार्य करत नसेल तर साम, दाम, दंड या नीतीचा वापर केला जातो.

'स्त्रीवाद', 'नवा स्त्रीवाद' आणि 'स्त्रियांच्या चळवळी' या संज्ञा सामान्यत: भिन्न अर्थाने वापरल्या जातात. रूढ व्याख्येनुसार सर्वसामान्यत: ''स्त्रीवाद म्हणजे स्त्रियांच्या हक्कासंबंधी भूमिका तर स्त्रीमुक्तीचा अर्थ स्त्रियांना संपूर्ण स्वातंत्र्य. स्त्री चळवळीच्या इतिहासकार गेल येटस यांनी दाखविल्याप्रमाणे 'स्त्री-मुक्ती' ही संज्ञा सरसकटपणे 'नवा स्त्रीवाद' या संज्ञेसाठी वापरली जाते. खरे तर 'स्त्री-मुक्ती' ही संज्ञा अधिक मूलभूत आणि आक्रमक राजकीय विचारसरणी अंगिकारणाऱ्या स्त्रियांच्या संदर्भात जाणिवपूर्वक निर्माण केली गेली.''[२]

टॉम बॉटमूर (१९८३) आणि इतरांनी संपादित केलेल्या 'ए डिक्शनरी ऑफ मार्क्सिस्ट थॉट' मध्ये स्त्रीवादाचा अर्थ आणि महत्त्व पुढीलप्रमाणे सांगितले आहे. ''स्त्रीवाद हा वादग्रस्त विषय आहे. क्रांतिकारी मार्क्सवाद आणि उदारमतवाद यामुळे स्त्रीवाद हा स्त्री-पुरूष समानतेचा विषय आहे असा युक्तिवाद एका बाजूने करता येतो तर दुसऱ्या बाजूने, स्त्रियांचे शोषण आणि पिळवणूक यांचा नाश केल्याशिवाय मानवी मुक्ती शक्य नाही. परंतु हे सर्व फक्त समाजवादी क्रांतीमधूनच प्रस्थापित होऊ शकेल असा विचार मांडला जातो.''[३]

'स्त्री'वर लादलेले स्त्रीत्व हे नैसर्गिक लिंगभेदामुळे कार्य-विभाजन किंवा श्रम विभाजन घडते, असे वर वर पाहता दिसते. परंतु नैसर्गिकतेची संकल्पनाच संस्कृतिजन्य असते, असे स्त्रीवादाचे एक महत्त्वाचे प्रमेय आहे. ''स्त्री म्हणून आपण जन्म घेत नसतो, तर आपण स्त्री बनत असतो.''[४] (One is not born a women rather one becomes a women) हे सीमॉन द बोव्हाचे विधान सकृतदर्शनी धक्कादायक वाटले तरी या संदर्भात अगदी सार्थ ठरतो. अर्थात आपण 'स्त्री' किंवा 'पुरूष' देह घेऊन जन्माला येतो, हे येथे नाकारावयाचे

नाही. परंतु या देहाबरोबर लाजाळूपणा, नाजुकपणा, भावनाप्रधानता, ममता, स्वार्थत्याग, समर्पण वगैरे गुणही जन्मजात असतात हे येथे नाकारायचे आहे हे गुण समाजाने व संस्कृतीने स्त्रीत्वावर लादलेले असतात. तेव्हा लिंगभेद म्हणजे सांस्कृतिक लिंगभेद नव्हे हे स्त्रीवादाने स्पष्ट केले आहे.

शेवटी 'स्त्रीवाद' म्हणजे स्त्रियांच्या शोषणांबद्दल, अत्याचारांबद्दल समाजात, कुटुंबात, कामाच्या जागी जागृती निर्माण करणे आणि ही परिस्थिती बदलण्यासाठी स्त्री-पुरूषांनी जाणीवपूर्वक विचार आणि कृती करणे म्हणजे 'स्त्रीवाद' होय. समाजातील लैंगिक भेदातून होणारे शोषण, विषमता यांचे अस्तित्व जाणू शकतो व इतरांना जाणवून देतो, जो पुरूषांचे वर्चस्व आणि पुरूषप्रधानता समजू शकतो आणि जो याविरूद्ध कोणती तरी कृती करतो ती व्यक्ती 'स्त्रीवादी' होय. "Any one who recognise the existence of sexism, male domination & portiarchy & who takes some action against it is a feminist." [५]

## १.२ स्त्रीवाद आणि स्त्रीवादी चळवळी :

'स्त्रीवादी' या संकल्पनेचा उदय व विकास स्त्रियांच्या क्रियाशील चळवळींमधून झालेला दिसतो. पुरूषांनी स्त्रियांकडे अभाववादी दृष्टिकोणातून पाहिले, तिचे माणूसपण नाकारले, निसर्गाने दिलेली समता नाकारली. स्त्रीवाद पुरूषी काव्याला विरोध करतो. स्त्रीवाद ही संकल्पना थोडक्यात पुढीलप्रमाणे सांगता येईल. ''अभावमूलक विचारसरणीला नकार देणे, स्त्री ही अपूर्ण मानव असल्याची समजूत नष्ट करणे आणि स्त्रीविषयक नवीन मानदंड निर्माण करण्यासाठी व्यहरचना करणे ही स्त्रीवादाची थोडक्यात भूमिका आहे.''[६]

स्त्रीवादी केवळ बौद्धिक चर्चा करत नाही. समाजातील विविध घडामोडीतून त्याचा विकास होत आला आहे. स्त्रीवादी सिद्धांताच्या पाठीमागे अनुभवांची शिदोरी आहे. ही विचारसरणी पुस्तकी नसून त्यात सिद्धांताचा खरेखोटेपणा सत्याच्या पातळीवर पारखून घेतला आहे.

स्त्रीवादी विचारसरणीचा उदय आणि विकास पाश्चिमात्य देशात झाला. स्त्रीवादाविषयी अनेक गैरसमज असलेले दिसतात. या चळवळीसंबंधी फार उथळपणे मते मांडली जातात. उदा. पुरूषांसारखे कपडे परिधान करणे, त्यांच्यासारखी सिगारेट, दारू यांची व्यसने असणे इत्यादी. परंतु हा स्त्रीवादाचा अर्थ होऊ शकत नाही. आजपर्यंत पुरूष समीक्षकांनी स्त्रीवादी चळवळ आणि स्त्रीवादी विचारसरणीतून निर्माण झालेले साहित्य यांची गांभीर्याने नोंद घेतलेली दिसत नाही. अशी स्त्रीवादी चळवळीत कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांची व लेखकांची खंत आहे.

''स्त्रीवाद म्हणजे पुरूषांपासून फारकत घेऊन स्वत:चा सवतासुभा निर्माण करणे नव्हे, पण संस्कृतीच्या हजारो वर्षाच्या इतिहासाने बाईचे 'मानवपण' नाकारून तिला जी पशुतुल्य अवस्था प्राप्त करून दिली आहे, त्यातून बाहेर पडून आपले हक्क प्रस्थापित करून घेण्यासाठी निर्माण केलेली ही चळवळ आहे.''[७]

स्त्रियांवर होत असलेल्या अन्याय अत्याचारांच्या विरोधात आवाज उठविणे, तिचे 'माणूसपण' तितला सन्मानाने बहाल करणे, समाजाने निर्माण केलेल्या एकांगी भूमिकेतून तिची सुटका करून समतावादी आणि अधिक स्वतंत्र जीवनाचा निर्भेळ आणि निर्मळ आनंद देणे ही स्त्रीवादी विचारसरणीची वैचारिक भूमिका आहे. ''मुळात 'स्त्रीवाद' ही संकल्पना एक सत्वावर उभी राहिलेली

नाही. ही बहुपेडी आहे. अनेक संकल्पना दृष्टिकोन व तत्त्वप्रणाली यांचा तीत समावेश होतो. स्त्रीवादी सिद्धांत केवळ तत्वविचारांवर अधिष्ठित नाहीत. वर्तमान काळातील स्त्रीजीवनाचा त्यांना आधार आहे. तसेच ते स्त्रीच्या वर्तमानकालीन स्थितीला पाहतात. स्त्रीवादी सिद्धांत हे स्त्रियांच्या चळवळीतून उदय पावलेले आहेत.''[८]

'स्त्रीवाद' ही संकल्पना फक्त बौद्धिक चर्चा करत नाही, चळवळ म्हणून प्रत्यक्ष स्त्रीप्रश्नांवर काम करत असताना जे अनुभव आले त्या अनुभवांमधून स्त्रीवादाची सैद्धांतिक मांडणी झाली आहे. 'स्त्रीवाद' ही संकल्पना व्यापक आहे. ती एक राजकीय विचारप्रणाली आहे. स्त्रीजीवनातील विविध समस्यांचा ती गांभीर्याने विचार करते.

'स्त्री' आणि 'पुरूष' या संकल्पना फक्त बौथद्धक चर्चा करत नाही. 'स्त्री' आणि 'पुरूष' या संकल्पना निसर्गाने निर्माण केलेल्या नाहीत तर त्या मानवनिर्मित आहेत किंवा समाजनिर्मित आहेत. निसर्ग 'नर' किंवा 'मादी' जन्माला घालत असतो म्हणजे दोघेही जन्मत: समान असतात. त्यांच्या 'लिंग' ही संकल्पना सोडी तर भेदभाव नसतो.

स्त्रीला बुद्धी नसते, म्हणून ती विचार करू शकत नाही. तिने आपली परंपरेने सांगितलेली कामे अर्थात ती पुरूषांच्या सोयीचीच असणार ती तिने निमूटपणे कोणताही प्रतिप्रश्न न विचारता करावीत हा विचार तिच्या डोक्यावर बिंबवला गेला. तिची एक सनातन प्रतिमा तयार करण्यात आली. ''स्त्रीची ही सनातन प्रतिमा पुसून टाकणे हे स्त्रीवादी चळवळीपुढचे एक महत्त्वाचे आव्हान आहे. पुरूषाला समाजरचनेत जसे महत्त्वपूर्ण स्थान आहे तसे स्त्रीलाही प्राप्त

व्हावे यासाठी जीवनाच्या सर्वच क्षेत्रात संघर्षशील राहणारी स्त्रीवाद ही एक विचारप्रणाली आहे.''[१]

कृषीसारख्या क्रांतिकारक व्यवस्थेचा शोध स्त्रीने लावला परंतु नंतर तिला बालसंगोपनात आणि स्वयंपाकघरात गुंतवण्यात आले. त्यातून तिच्या वाट्याला गुलामगिरीचे जगणे आले. घरातील महत्त्वपूर्ण विषयांवरील निर्णय प्रक्रियेत तितला कोणतेही स्थान राहिले नाही. पुरूषप्रधान समाजव्यवस्थेत तिला मर्यादित आणि परिघावरचे स्थान प्राप्त झाले.

१९ जुलै, १९४८ साली न्यूयॉर्क जवळ सेनका फॉल या लहानशा खेड्यात पाच स्त्रिया एकत्र आल्या व एलिझाबेथ कॅडी स्टॅन्ट्न ह्या बत्तीस वर्षाच्या एक स्त्रीने बाजारातील एका ओट्यावर चढून धीटपणे 'स्त्रियांनी आपले प्रश्न स्वत:च मांडले पाहिजेत कारण तिच्या समस्येची उंची, खोली, लांबी, रूंदी केवळ तिच समजू शकते.' असे प्रतिपादन करून 'स्त्री आणि पुरूष दोघेही परमेश्वराची निर्मिती असतील तर त्यांना समान हक्क का नसावेत ? असा जाहीर सवाल केला. 'स्त्रियांच्या संघटित चळवळीचा हा जगातील पहिला प्रतिकात्मक आविष्कार म्हटला पाहिजे.'

असे असले तरी स्त्रीवादी जाणिवांची लिखित अभिव्यक्ती सर्व प्रथम भारतात झाली हे सत्य आपणास नाकारता येणार नाही. १९८२ साली ताराबाई शिंदे या म.फुले यांच्या सहवासातील स्त्रीने 'स्त्री-पुरूष तुलना' हा दीर्घ निबंध लिहिला. या लेखनात त्यांनी परंपरेने चालत आलेला पुरूषी कावा ठिकठिकाणी उघडा पाडला आहे. 'स्त्री' आणि 'पुरूष' यांच्यात 'लिंग' या संकल्पनेतून निर्माण झालेली विषमता व त्यांचे परिणाम त्या व्यक्त करतात. पुरूषप्रधान

संस्कृतीने निर्माण केलेल्या लिंगभावामुळे स्त्री व पुरूष यांची जीवनपद्धती कशी वेगळी आहे या विषयीचे पायाभूत चिंतन त्यांच्या निबंधात पहावयास मिळते. युरोपातील सिमॉन-द-बोव्हा यांचे 'The Second Sex' हे पुस्तक ताराबाई शिंदे यांच्यानंतर कित्येक वर्षांनी प्रकाशित झाले. म्हणजेच बोव्हाच्या अगोदरही भारतात 'स्त्रीवाद' या विचारसरणीसंबंधी मूलगामी विचारमंथन चालू होते. स्त्रीवादी विचारसरणीचा मुळात शोध घेतला ताराबाई शिंदे यांच्या 'स्त्री-पुरूष तुलना' या दीर्घ निबंधाने हे विसरून चालणार नाही.

ताराबाई शिंदे यांचा अपवाद वगळता या काळात गांभीर्याने स्त्री प्रश्नांची चर्चा कोणत्याही स्त्रीने केलेली दिसत नाही. याच दरम्यान लोकशाहीचीजननी असलेल्या इंग्लंड या देशात स्त्री प्रश्नासंदर्भात चळवळीला प्रारंभ झालेला दिसतो. जॉन स्टुअर्ट मील यांनी पुरूषांप्रमाणेच स्त्रियांनाही मतदानाचा अधिकार असावा अशी १८६७ साली मागणी केली. १८७८ मध्ये स्त्रियांच्या अधिकारांसाठी आंतरराष्ट्रीय परिषद झाली. १८९२ साली 'फेमिनिस्ट कॉंग्रेस' ही स्त्री स्वातंत्र्यासाठी धडपडणाऱ्या स्त्री कार्यकर्त्यांची परिषद भरविण्यात आली. स्त्रियांना मतदानाचा हक्क असावा ही मागणी १९०१ साली करण्यात आली. १९४५ साली मतदानाचा अधिकार मिळाला. याच काळात स्त्रियांच्या प्रश्नांची चर्चा करणारे व स्त्रीवादी जाणिवा व्यक्त करणारे लेखन प्रसिद्ध होऊ लागले.

थोडक्यात १९व्या शतकातमतदानाच्या निमित्ताने निर्माण झालेल्या चळवळीत आपणास स्त्रीवादी विचारसरणीच्या आणि चळवळीच्या खुणा सापडतात.

## १.३ भारतीय स्त्रीवादाची वाटचाल :

भारतीय समाजव्यवस्थेत स्त्रीला कित्येक शतकांपासून दुय्यम दर्जाचे स्थान दिलेले आहे. प्राचीन धर्मग्रंथ आणि पुरूषसत्ताक कुटुंबव्यवस्था यांच्या संगनमतातून निर्माण झालेले ग्रंथ आणि परंपरा यांना ही स्त्री एवढी बंदिस्त झाली आहे की, तिच्या 'सत्वा'चा विचार तिला कधीच शिवला नाही. 'चूल आणि मूल' एवढेच आपले कार्यक्षेत्र. आपला 'नवरा' म्हणजेच परमेश्वर त्याची सेवा हाच आपला पत्नीधर्म, मग तो कितीही वाईट चालीचा किंवा त्रास देणारा असो. यातूनच भारतीय संस्कृतीत 'वटसावित्री'सारख्या व्रतांना महत्त्व आले असावे व त्यातूनच पुरूषी कावा यशस्वी झाला असावा.

''एकीकडे स्त्रीला दुर्गा, कालिका, जगदंबा असे शक्तिवान देवतांचे स्थान असले तरी ते दिशाभूल करणारे आहे. 'चूल आणि मूल' यांच्या पलीकडे स्त्रियांना पारंपरिक समाजव्यवस्थेत दुसरे कुठले स्थान असण्याचे कारणच नाही असा सर्वसाधारण समज आहे.''[१०]

आजची स्त्री शिक्षण घेऊ लागली आहे. पुरूषांच्या खांद्याला खांदा लावून काम करू लागली आहे. त्यांच्या शिक्षणाचे प्रमाणही वाढायला लागले आहे. तिचे कर्तृत्व बहराला येऊ लागले आहे. ती राजकारण व समाजकारण यात शिरून स्वत:चा ठसा उमटवू लागली आहे. असे असले तरी ती घरात आली म्हणजे भारतीय परंपरेने लादलेल्या पारंपरिक भूमिकेत बंदिस्त होते. त्या भूमिका म्हणजे पत्नी, बहीण किंवा आई, मुलगी इ. तिचे वैयक्तिक जीवन हे तिचे राहत नाही. पुरूषप्रधान सत्ता तिच्यावर आपले वर्चस्व गाजवत असते.

भारतीय स्त्रीवादाच्या मांडणीचे श्रेय म. जोतिराव फुले, ताराबाई शिंदे, पंडिता रमाबाई, राजाराम मोहन रॉय, म. गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना द्यावे लागते. 'आम्ही स्त्रीवादी आहोत असे म्हणत त्यांनी स्त्री स्वातंत्र्याविषयीचे विचार मांडले नसले तरीही त्यांच्या सततच्या लेखनातून आपणास त्याविषयीची कल्पना येते.'

इंग्रजांनी भारतात पाश्चिमात्य शिक्षणाची सोय उपलब्ध करून दिली. आजपर्यंत जो वर्ग शाळेत जात नव्हता त्यांना आता महाविद्यालयीन आणि विद्यापीठीय शिक्षणाची संधी मिळू लागली. १९४८ साली म. फुले यांनी स्त्रीशिक्षणाचा पाया पुणे या शहरात 'भिडेवाडा' या ठिकाणी रचला, या घटनेत आधुनिक भारतीय स्त्रीवादी चळवळींची मुहुर्तमेढ रोवली गेली. म. फुले यांचा वारसा सांगणाऱ्या ताराबाई शिंदे यांनी 'स्त्री-पुरूष तुलना' हा दीर्घ निबंध लिहिला. याचे प्रकाशन १८८४ साली झाले. या निबंधात ताराबाईंनी भारतीय स्त्रीवादी जाणिवांचा पहिला हुंकार दिला असे म्हणता येईल. या दीर्घ निबंधातून त्यांनी स्त्रियांवर होत असलेला अन्याय, तिचे परंपरेने सतत केलेले अपमान यांचा समाचार घेतला. स्त्री आणि पुरूष यांच्यातील विषमता त्यांनी वेशीवर टांगली. भारतीय परंपरेत काही वाईट प्रथा आहेत. उदा. 'सतीची चाल' यांचाही मोठ्या उपहासगर्भ शैलीत समाचार घेतला. याविषयी त्या म्हणतात, 'पुरूष' मरण पावल्यावर त्याची पत्नी सती जाते त्याचप्रमाणे 'स्त्री' किंवा 'पत्नी' मरण पावल्यावर पुरूषाने 'सती' का जावू नये ? असा अनेक प्रश्न त्यांनी पुरूषप्रधान परंपरेला विचारला आहे. ''पुरूषनिर्मित साहित्यातील स्त्री-दर्शन कसे एकांगी व सांकेतिक आहे हे त्यांनी अनेक उदाहरणांच्यामार्फत पटवून दिले.''[११]

ताराबाई शिंदे यांचा कालखंड हा फ्रेंच विदुषी विमॉन–द–बोव्हा यांच्याही आधीचा आहे. ताराबाईंच्या काळातील महाराष्ट्रातील सामाजिक परिस्थिती पाहता त्यांचे विचार क्रांतिकारक होते यात शंका नाही. ''पुरूषनिर्मित साहित्यातील स्त्रीच्या सांकेतिक चित्रणातील 'पुरूषी कावा उघड करणे हा स्त्रीवादी वाचनाचा नमुनादर्श ताराबाईंनी आपल्या निबंधात मांडून एका अर्थाने भारतीय संदर्भात स्त्रीवादी वाचनाची दिशाच दाखवून दिली आहे.''[१२]

ताराबाई शिंदे यांच्या अगोदर महाराष्ट्रात स्त्री–शूद्रांसाठी शाळासुरू करणारे म. जोतिराव फुले यांचे कार्य खूप मोठे आहे. सर्वसामान्य घरातील स्त्रीने शिक्षण घ्यावे तिच्यातून सर्व कुटुंबाचा विकास होतो, हा विचार फुल्यांनी मांडला आणि आपल्या कार्याच्या माध्यमातून त्यांनी अंमलात आणला. 'डॉ. गेल ऑम्वेट म. फुले यांच्या कार्याविषयी लिहितात, ''म. फुल्यांनी अगदी शोषित बहूजन समाज कुटुंबात सुद्धा स्त्रियांची दडपणूक हा अगदी ठोस आणि महत्त्वाचा प्रश्न असल्याची मांडणी केली आहे.''[१३]

डॉ. पंडिता रमाबाई यांनी स्त्रियांच्या दु:खांना वाट करून देण्यासाठी 'आर्य महिला समाज' ही पहिली स्त्रियांची संघटना स्थापन केली व स्त्रीमुक्तीच्या विचारांना प्रेरणा दिली. आजपर्यंत वेगवेगळ्या किंवा सुरक्षा पातळीवर कार्य करणाऱ्या स्त्री कार्यकर्त्यांची संघटितपणे कार्य करणारी ही पहिली संघटना होती.

बदलत्या काळाप्रमाणे आणि शिक्षणाच्या प्रसाराप्रमाणे भारतीय स्त्रीवादाची चळवळ विकसित होत गेली. जागतिक पातळीवरच्या स्त्रीवादी चळवळीचा अभ्यास करता एक निष्कर्ष निघतो आणि तो म्हणजे या चळवळी शहरात राहणाऱ्या पांढरपेशा स्त्रियांपुरत्याच मर्यादित राहिलेल्या दिसतात. परंतु

भारतीय स्त्रीवादी चळवळी थोड्याफार प्रमाणात शेतकरी, दलित यांच्यापर्यंत पोहचताना दिसतात याची कारणे या ठिकाणी निर्माण झालेल्या प्रबोधनाच्या चळवळीत आहेत.

"भारतीय स्त्रीवाद ही पांढरपेशा स्त्रियांची चळवळ होता कामा नये. शेतकरी, कामगार दलितांच्या शोषणमुक्तीच्या लढ्याबरोबर स्त्रीमुक्तीची लढाई सर्व समाजाच्या शोषणमुक्तीच्या लढाईचा भाग बनली पाहिजे."[१४]

भारतीय स्त्रीवादाच्या चळवळींचा सुटा विचार करताच येणार नाही. त्यासाठी या ठिकाणी असणारी समाजव्यवस्था, धर्मसंस्था यांच्या परिप्रेक्ष्यातून स्त्रियांच्या प्रश्नांकडे पहावे लागेल. "भारतातील हिंदू, मुसलमान, बौद्ध, जैन, ख्रिश्चन या सर्वच धर्मातून सर्वसाधारणपणे स्त्रीच्या शोषणाचेच नियम झालेले दिसतात. मात्र तरीही जेथे जेथे स्त्रियांच्या सन्मानाचा हक्कांचा निर्देश असले, तिथल्या नियम प्रथांचा, मिथकाचा शोध घेऊन त्यांची पुनर्स्थापना केली पाहिजे."[१५]

पाश्चात्य जगात निर्माण झालेली स्त्रीवादी चळवळ आणि भारतीय स्त्रीवादी चळवळ यांच्यात वेगळेपणा आहे आणि तो म्हणजे "स्त्री-पुरूष समानतेची स्वप्ने साकार करणारी जीवनपद्धती सुचविणारी नवी स्त्रीवादी आचारसंहिता देणे हे भारतीय स्त्रीवादी मांडणीचे उद्दिष्ट असले पाहिजे."[१६]

भारतात स्त्री आणि पुरूष यांच्या समतेची लढाई फार पुढे गेलेली नाही. आजही स्त्रियांवर होणारा अन्याय-अत्याचार कमी झालेला नाही. यासाठी भारतीय राजकारणाचा समाजकारणावर असणारा प्रभाव कारणीभूत असावा.

भारतीय स्त्रीवादाच्या विकासाला खऱ्या अर्थाने १९६० नंतरच प्रारंभ झाला. यानंतरच्या कालखंडात पाश्चिमात्य स्त्रीवादाचा प्रभाव आहे. त्यामुळे स्वत:चे वेगळे विचारविश्व आणि भारतीय समस्यांचा विचार करून किंवा भारतीय परिप्रेक्षातून स्त्रियांच्या प्रश्नाकडे पहाणे हे भारतीय स्त्रीवादापुढील एक महत्त्वाचे आव्हान आहे. त्याचप्रमाणे विविध ललित कलांमध्ये स्त्रियांच्या प्रतिभेचा आणि तिचे विविध प्रश्न मांडणाऱ्या साहित्याची निर्मिती करणे हे देखील स्त्रीवादासमोरील आव्हान आहे.

## १.४ स्त्रीवादी साहित्य :

'स्त्रीवादी साहित्य' ही संकल्पना गेल्या तीन-साडेतीन दशकातील आहे. मराठीत तर गेल्या दशकातच 'स्त्रीवादी साहित्या'संबंधी लिहिले-बोलले जाऊ लागले आहे. विशेषत: १९७५ ते १९८५ या आंतरराष्ट्रीय महिला दशकांत स्त्रियांच्या अस्मिता-जागृतीसंबंधी जे संघटित प्रयत्न झालेत, त्याच्या प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष प्रभावातून स्त्रियांच्या साहित्यातून नव्या जाणिवा व्यक्त होऊ लागल्या. साहित्यातील स्त्रीप्रतिमेचे पुनर्वाचन करण्याची निकड निर्माण झाली आणि या प्रक्रियेतूनच 'स्त्रीवादी साहित्य' लिहिणाऱ्या लेखिकांचा एकसंघ गट जरी नसला तरी या काळातील स्त्रियांच्या लेखनातून स्त्रीवादी जाणिवा प्रकर्षाने आढळतात म्हणून त्यांच्यया साहित्याला 'स्त्रीवादी साहित्य' म्हटले जाऊ लागले.[१७]

मराठी साहित्याच्या संदर्भात लेखिकांनी स्त्रीवादी भूमिकेचा विचार करताना असे दिसते की, ''भारतीय केवळ स्त्रीवादी भूमिकाच स्वीकारून विशिष्ट हेतूने जाणीवपूर्वक विचारप्रवर्तक स्वरूपाचे लेखन केलेले आहे, असे नाही मात्र तरीही मराठीत स्त्रीवादी साहित्याचा, स्वतंत्र साहित्यप्रवाह मानला जातो. विशेष

म्हणजे 'स्त्रीवाद' ही संकल्पना आकाराला येण्याच्या पूर्वीच्या लेखनाचा विचारही 'स्त्रीवादी साहित्य' म्हणून केला जातो.''

मराठीत स्त्रीवादी साहित्य, ग्रामीण साहित्य, दलित साहित्य हे प्रवाह एकाच काळातील. साठोत्तरी साहित्यप्रवाह या तीनही साहित्यप्रवाहांच्या बाबत पहिल्या पिढीच्या समीक्षकांनी जो विचार मांडला तोच नंतरच्या समीक्षकांनी प्रमाण मानून आपल्या समीक्षेची मांडणी केली. त्यातूनच या तीनही साहित्यप्रवाहांबाबत 'परिवर्तनवादी साहित्य' ही भूमिका सर्वमान्य झाल्याचे दिसते. विशेषत: स्त्रीवादाच्या बाबत पाश्चात्य स्त्रीवाद आणि भारतीय स्त्रीवाद अशी वेगळी सैद्धान्तिक मांडणी न करता बरेचदा 'स्त्रीवाद' ही मोघम संकल्पना स्वीकारून स्त्रीवादी साहित्य परिवर्तनवादी साहित्य असल्याचे मत मांडले गेले व मान्य झाले. रा.ग. जाधव यांनी ''स्त्रीवाद हा समाजाच्या व संस्कृतीच्या व्यापक परिघाला पूर्ण ग्रासणारी सांस्कृतिक परिवर्तनाची प्रणाली आहे, केवळ वाङ्मयीन प्रणाली नाही''[१८] असे मत मांडले आहे. मंगला वरखेडे यांची भूमिका अशाच स्वरूपाची दिसते. शिरीन कुडचेडकरांनीही वरील भूमिका प्रमाण मानल्याचे दिसते. त्या लिहितात, ''स्त्रीवाद ही केवळ एक सैद्धान्तिक विचारप्रणाली नसून ती गतिशील आणि कृतिनिष्ठ स्वरूपाची आहे. आपल्या भोवतालचे जग केवळ समजून घेणे एवढ्यापुरते तिचे उद्दिष्ट मर्यादित नसून ते जग बदलण्याचा प्रयत्न करणारी ही विचारप्रणाली आहे.''[१९] तर वाङ्मयीन संज्ञा संकल्पना कोशकारांच्या मते ''स्त्रियांना समाजाच्या मुख्य प्रवाहापासून दूर ठेऊ पाहणाऱ्या व्यूहांमधून स्त्रियांना सोडवणे हे स्त्रीमुक्ती चळवळीचे मुख्य कार्य आहे व स्त्रीवादी साहित्याचा अभ्यास, स्त्रीवादी समीक्षा हे त्याचेच एक साधन आहे.''[२०]

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

स्त्रियांच्या चळवळी जसजशा जोर धरू लागल्या तसतसा स्त्रीवादी विचारसरणीचा प्रभाव जाणवू लागला स्त्रियांच्या चळवळींमधून स्त्रीवादाची सैद्धांतिक मांडणी झत्तली व त्यातूनच पुढे 'स्त्रीवादी साहित्य' नावाचा स्वतंत्र असा प्रांत निर्माण झाला. स्त्रीसाहित्याचा अभ्यास करता 'आजही स्त्रीवादी साहित्य अधिक प्रमाणात निर्माण झालेले दिसत नाही. स्त्रीवादी साहित्य म्हणजे काय ? असा प्रश्न जेव्हा विचारला जातो तेव्हा अनेक गैरसमज असलेली उत्तरे ऐकायला मिळतात. 'स्त्रियांनी लिहिलेले साहित्य म्हणजे स्त्रीवादी साहित्य' ही व्याख्या केली जाते. परंतु ती दिशाभूल करणारी आहे. स्त्रियांनी लिहिलेले साहित्य स्त्रीवादी असेलच असे नाही. 'पुरूषांनी लिहिलेले साहित्य ही स्त्रीवादी असू शकते ?' 'ज्या साहित्यात स्त्रियांचे चित्रण आलेले आहे ते साहित्य म्हणजे स्त्रीवादी साहित्य होय.' ही व्याख्याही चुकीची आहे. "ज्या साहित्यातून स्त्रीवादाच्या विचारसरणीप्रमाणे जीवन जगण्याचा प्रयत्न करणाऱ्या स्त्रीमनाचा, कृतीचा जीवनाचा आणि असे करताना निर्माण झालेल्या संघर्षाचा आविष्कार घडतो त्या साहित्याला स्त्रीवादी साहित्य असे म्हणता येईल."[२१] स्त्रीवादी विचारसरणीत विचार सांगण्यात येणाऱ्या सिद्धांताची वाङ्मयीन मांडणी असलेले साहित्य म्हणजे स्त्रीवादी साहित्य होय. हे साहित्य पारंपरिक साहित्य पद्धतीला नाकारते. त्यात स्त्रियांच्या स्वत:चे शारीरिक अनुभव आणि स्वत:ची भाषा यांना महत्त्वाचे स्थान आहे.

स्त्रियांचे लेखन आणि स्त्रीवादी लेखन यातही फरक आहे. ती फक्त स्त्री आहे आणि तिने लिहिलेले साहित्य म्हणून ते स्त्रीवादी साहित्य असू शकत नाही. रोजलिंड कावर्ड यांनी Are women novels feminist novels ? हा अतिशय महत्त्वाचा निबंध लिहिला. या निबंधात स्त्रियांचे साहित्य आणि स्त्रीवादी साहित्य

यातील सीमारेषा स्पष्ट करण्यात आल्या आहेत. कावर्ड म्हणतात, 'पितृसत्ताक समाज व्यवस्थेने दडपून टाकलेल्या, कोंडमारा केलेल्या स्त्रीमनाचा, स्त्री जीवनाचा त्या समाजव्यवस्थेविरूद्ध दिलेल्या संघर्षाचा अविष्कार घडविणारे साहित्य म्हणजे स्त्रीवादी साहित्य होय. 'स्त्री' ही माणूस आहे असे मानणारे तिचे नाकारलेले माणूसपण तिला बहाल करणारे, स्त्री आणि पुरूष यांच्यात समता प्रस्थापित करणारे, स्त्रीची 'बाई' या पारंपरिक जोखडातून मुक्तता करणारे साहित्य म्हणजे स्त्रीवादी साहित्य होय. स्त्रीवादी साहित्य हे परंपरेने स्त्रीला जी हीन वागणूक दिली गेली तिचा निषेध करून स्त्रीच्या 'माणूसपणाचा' विचार करते. हे करत असताना स्त्री जातीच्या अन्याय अत्याचाराच्या इतिहासाचा शोध घेऊन त्यातील 'पुरूषप्रधान कुटुंबव्यवस्था' या संकल्पनेला विरोध केला गेला आहे. स्त्रीवादी साहित्यात 'पुरूषसत्ताक व्यवस्थेमुळे स्त्री कशी बंदिस्त होत गेली याचे विवेचन केले आहे. स्त्रीकडे आजपर्यंत न्यूनतावादी किंवा अभाववादी दृष्टिकोणातून पाहिले आहे. पुरूषाला नेहमीच केंद्रस्थान मिळाले आहे तर स्त्रीला परिघावरचे स्थान मिळाले. स्त्रीवादी साहित्य स्त्रीला ही केंद्रस्थानी मानले आणि त्याचा आविष्कार करते.''

एखाद्या साहित्यकृतीला स्त्रीवादी ठरवत असताना त्या साहित्यकृतीतील स्त्री प्रतिमा कशी आविष्कृत झाली आहे याचा विचार करावा लागतो. त्या साहित्यकृतीतून व्यक्त होणारी स्त्री प्रतिमा पारंपरिक विचार स्वीकारून व्यक्त होणारी असल्यास ती साहित्यकृती 'स्त्रीवादी' नसली तरी स्त्रीवादी दृष्टिकोणातून तिचा अभ्यास करून तिची पारंपरिक प्रतिमा बनण्याच्या कारणांचा शोध घेता येतो. कारण स्त्रीवादीसाहित्य परंपरा नाकारते. परंपरेने स्त्रियांना ज्या गोंडस जीवनात रममाण व्हावयास भाग पडले ते गोंडस आवरण असलेले जीवन

नाकारते. तिच्या कृतीचे चित्रण जर साहत्यात आले असेल तर त्या साहित्याला स्त्रीवादी साहित्य म्हणता येईल म्हणजेच साहित्यप्रकृतीतून आविष्कृत होणारी स्त्री प्रतिमा कशी व्यक्त होते यावरून ते साहित्य स्त्रीवादी आहे किंवा नाही ही गोष्ट स्पष्ट होते. यावरून ते साहित्य स्त्रीवादी आहे किंवा नाही ही गोष्ट स्पष्ट होते. 'लिंग या घटकाच्या आधारे समाजात स्त्री आणि पुरूष असे दोन भाग पाडले गेले आहेत. स्त्रीवादी साहित्य लिंगाच्या आधारे कोणी श्रेष्ठ वा कनिष्ठ आहे हे मानत नाही, तर ते समतावादी, मानवतावादी भूमिका व्यक्त करते. एखाद्या साहित्यकृतीत लिंगभावासंबंधी कोणता दृष्टिकोण स्वीकारला गेला आहे यावरून साहित्य स्त्रीवादी आहे किंवा नाही हे स्पष्ट केल्या जाऊ शकते.'

स्त्रीवादी साहित्यात स्त्रीच्या 'तिच्या खास अनुभवांना खूप महत्त्व असते. ते फक्त तिचेच असतात. 'तिची' स्वत:ची एक 'भाषा' असते. ती स्त्रीवादी साहित्यातून व्यक्त होत असते. स्त्रीवादी साहित्यातील अनुभव हे फक्त 'तिचेच' असतात. 'त्या' अनुभवात परंपरेच्या विरोधात बंडाचा झेंडा असतो. स्त्रीवादी साहित्यात स्त्री स्वत:चा शोध घेत असते. ''स्त्रीवादी साहित्य सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय परिवर्तनाच्या चळवळींना पूरक ठरणारे साहित्य असते.''

थोडक्यात स्त्रीवादी साहित्याची निर्मिती स्त्री अस्मितेचा शोध घेण्याच्या प्रक्रियेतून झाली आहे. स्त्रीवादी साहित्य स्त्रियांचे 'माणूसपण' केंद्रवर्ती मानते.

स्त्रीवादी साहित्याची भूमिका विशद करताना डॉ. नागनाथ कोत्तापल्ले लिहितात, ''स्त्री दृष्टीने जगाचा अन्वयार्थ लावता आला पाहिजे आणि या दृष्टीनेच अनुभवाचा आविष्कार केला पाहीजे, अशी स्थूलमानाने स्त्रीवादी साहित्य चळवळीची भूमिका मांडता येईल. या साहित्य चळवळी जीवनाशी

अधिक निगडित आहेत. किंबहुना जीवन परिवर्तनाची मागणी या साहित्य चळवळी करीत आहेत की या साहित्याचे प्रयोजनच हे आहे आणि यातच या साहित्य चळवळींचे वेगळेपण आहे."[२२] आनंद यादव यांनीही स्त्रीवादी साहित्याची भूमिका समग्र परिवर्तनाची आहे अशी भूमिका मांडलेली दिसते. स्त्रीवादी साहित्याच्या इतर अभ्यासकांनीही या मळलेल्या वाटेवरूनच प्रवास केल्याचे दिसते.

स्त्रीवादी साहित्याविषयी मान्यवर अभ्यासकांनी जी मते मांडलेली आहेत त्यातून स्त्रीवादी साहित्याची भूमिका अधोरेखित होते. ती सैद्धांन्तिक भूमिका थोडक्यात अशी सांगता येईल.

१) स्त्रियांना सर्व प्रकारच्या शोषणापासून मुक्त करण्याचे स्त्रीमुक्ती चळवळीचे मुख्य कार्य मानले जात असून, स्त्रीवादी साहित्य स्त्रीमुक्ती चळवळीचे साधन मानले जाते.

२) स्त्रीवादी भूमिका कलाकृतीच्या कलात्मकतेला व आकृतिबंधाला नाकारत नाही, मात्र साहित्यकृतीतून मानवतावादी समताधिष्ठित जीवनमूल्यांच्या मांडणीचा आग्रह धरते.

३) स्त्रीवाद, तर्काधिष्ठित वैचारिकतेवर आधारलेली, सर्वस्तरीय पीडीतांच्या मुक्तीस उपकारक ठरणारी विचारप्रणाली असून, इथे वैचारिकतेला वर्तनाची-प्रत्यक्ष कृतीची जोड अपेक्षित मानली जाते.

४) स्त्रीवादी साहित्य परिवर्तनवादी साहित्य मानले जात असून, अपेक्षित परिवर्तनासाठी कलाकृतीच्या माध्यमातून जीवनमूल्यंची मांडणी केली जाते. हा साहित्यप्रवाह वृत्यंतराची मागणी करणारा आहे.

५) स्त्रीवादी भूमिका स्वार्थप्रेरित अन्यायमूलक सनातनी पुरूषी मानासिकतेला विरोध करणारी व ती मानसिकता बदलविण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न केला जावा असे मानणारी आहे.

६) स्त्रीवाद, स्त्रीचे नैसर्गिक मादीपण व त्या मादी असण्याला जोडून येणाऱ्या अटळ बाबीला विरोध करीत नाही तर समाजनिर्मित बाईपण व त्याला जोडून लादलेल्या अन्यायमूलक बाबीला विरोध करते.

७) स्त्रीवाद, स्त्रीचे नैसर्गिक, स्त्रीकडे स्त्री म्हणून पाहाते व स्त्री म्हणून तिच्यावर होणाऱ्या सर्व प्रकारच्या अन्यायाला विरोध करते. इथे जात-धर्म-वर्ण-वर्ग-पंथादि बाबी विचाराला घेतल्या जात नाहीत. सैद्धान्तिक पातळीवरील मानवतावादी स्वरूपाचा हा एक चिरंतन मूल्यविचार आहे.

८) स्त्रीवादात ऐहिक जीवन महत्त्वाचे मानले जाते व सुखी ऐहि जीवनासाठी जे जे आवश्यक ते ते स्वीकारण्याची भूमिका मांडली जाते. मात्र त्याचवेळी माणुसकी आणि देश-स्थल-काल-प्राप्त परिस्थितीसापेक्ष नैतिकतेची आचरणाशी जोड असावी असाही आग्रह धरला जातो.

९) स्त्रीला व्यक्ती म्हणून, नागरिक म्हणून सन्मान हवा व त्यासाठी ज्या व्यवस्थेने तिच्या व्यक्तित्वाला गौण मानले त्या व्यवस्थेला विरोध करणे अपरिहार्य ठरते. स्त्रीवाद, सैद्धान्तिक पातळीवर विघातक श्रद्धाविरोधी भूमिका स्वीकारते.

स्त्री साहित्याचे स्वरूप कसे असावे याविषयीही हेलन सिझू हिने दिग्दर्शन केले आहे. तिच्यामते स्त्रियांचे साहित्य हे एकाच वेळी सर्व बाजूंनी विकसित होत जाणारे लेखन असले पाहिजे. पुरूषमताप्रमाणे एखाद्या गोष्टीची सुरूवात किंवा उगम शोधून काढण्याची आस असण्याचे तिला कारण नाही. तिचे हे लेखन अनादी अनंत असले पाहिजे. पुस्तक संपले तरी लेखन संपले असे असता कामा नये. पूर्वानुमान काढणारे किंवा तर्क करता येणारे लेखन तिने टाळावे. अर्थापेक्षा भावगर्भतेच्या जवळ जाणारे लेखन तिने टाळावे. अर्थापेक्षा भावगर्भतेच्या जवळ जाणारे लेखन हे स्त्रीत्वाच्या जवळ जाणारे ठरेल. पुरूषांचे लेखन आणि स्त्रियांचे लेखन यांची तुलना करून सिझू म्हणजे की, एखाद्या गोष्टीबद्दल शोक करणे म्हणजे ती गेलेली गोष्ट परत मिळविण्याचा प्रयत्न करण्यासारखे होईल. असा शोक पुरूष करतो. स्त्री मात्र हा शोक पचवून पुढे जात असते. म्हणजेच निर्माण झालेली उणीव किंवा तोटा उगाळत न बसता, आहे हे वास्तव स्वीकारून स्त्री पुढे जात असते. तिच्यावर मात करण्याचा ती प्रयत्न करते. या अर्थाने पुरूषांपेक्षा स्त्रियांचे वाङ्मय निराळे असेल. ''आपल्या सांस्कृतिक विश्वात स्त्रीने खूप रडून घेतले आहे. पण एकदा का ते अश्रू सुकले की तिथे असणारा आनंदाचा अखंड झरा बाहेर येईल. तीच स्त्रीची खरी ताकद आहे. त्यासाठी तिला आधी मुक्त व्हावे लागेल. मुक्त झाल्यावर ती स्वत:शीच जशी हसते तसा तिचा साहत्यातील उद्गार असेल. तो अधिक निखळ, विशुद्ध आणि सुंदर असेल !''[२३]

## १.५ स्त्रीवादी समीक्षा :

जगातील बहुतेक संस्कृती ह्या पुरूषप्रधान संस्कृती आहेत. या पुरूषप्रधान संस्कृतीत व समाजरचनेत पुरूषवर्गाच्या हितसंबंधाची जपणूक प्रत्यक्षाप्रत्यक्षपणे

केली जाते. त्यामुळे ती समाजरचना पुरूषवर्गाला हितकारक व फायदेशीर ठरलेली आहे. ''या पुरूषप्रधान समाजरचनेत होणाऱ्या आपल्या स्त्रीत्वहरणाची व शोषणाची जाणीव स्त्रीला अनेक कालखंडातून कमी-अधिक प्रमाणता होत आलेली आहे. परंतु आधुनिक कालखंडात ती जाणीव तिला विशेष तीव्रपणे होऊ लागली. आपल्या स्त्रीत्वहरणाची व शोषणाची ही जाणीव तीव्रपणे होताच ही स्त्री प्रस्थापित पुरूषप्रधान संस्कृतिविरूद्ध बंड करून उठली व त्या जाणिवेचा आविष्कार आपल्या कृतीतून, वाणीतून व लेखणीतून प्रभावीपणे करू लागली.''[२४]

पुरूषप्रधान संस्कृतीतील परंपरेचे व पुरूषार्थाचे गोडवे गाइले जात असताना पुष्कळदा पत्नी, सती,दासी, देवदासी, रखेली, वेश्या, अस्पर्शा, परित्यक्ता, हुंडाबळी, बलात्कार-बळी आदी असंख्य स्त्रियांनी व स्त्रीवर्गांनी भोगलेल्या मनोवेदना व यातना दाबल्या दडपल्या जातात. या दडपलेल्या वेदनेला वाचा फोडण्याचे कार्य स्त्रीवादी साहित्याने व समीक्षेने केले आहे व ते आजही केले जात आहे. स्त्रीच्या या बंडखोर, स्वतंत्र कृतीतून आणि स्त्री-अस्मितेच्या अस्तित्वभानातून स्त्रीमुक्तीच्या आंदोलनाचा, स्त्रीवादाचा व स्त्रीवादी साहित्य व समीक्षा यांचा जन्म झाला.

स्त्रीवादी साहित्य समीक्षा किंवा साहित्याभ्यासाची संकल्पना कोणत्यातरी एका तत्वावर वा एकसत्वावर उभारलेली नाही. अनेक तत्वे, संकल्पना, दृष्टिकोन व तत्त्वपद्धती यांचा अंतर्भाव यात झाला आहे. आपले उद्दिष्ट साध्य करण्यासाठी स्त्रीवादी समीक्षकांनी अनेकविध ज्ञानशाखांचा व अभ्यासपद्धतींचा आश्रय घेतलेला आहे. स्त्रीवादीसमीक्षेला अनेकविध विषय हाताळायचे आहेत. ''स्त्री साहित्याचे स्वरूप, त्याच्या निर्मितीमागील प्रेरणा, स्त्री साहित्याची परंपरा, त्या

साहित्याचा इतिहास पाहणे, त्याच्या आधारे सर्व साहित्येतिहासाची व वाङ्मयीन परंपरेची पुनर्मांडणी करणे साहित्याचे लिंगसापेक्ष वाचन, आस्वाद, लिंगाचे स्वरूप व संरचना ही जैविक आहेत की ती संस्कृति विरचित आहेत, स्त्री-संस्कृती, स्त्री-भाषा, स्त्री-लक्ष्यी ज्ञानमीमांसा अशा अनेकविध विषयांचा अभ्यास स्त्रीवादी साहित्याभ्यास केला जातो.''[२५] या अभ्यासासाठी मनोविज्ञान, मानववंशशास्त्र, समाजशास्त्र, चिन्ह-मीमांसा, संज्ञा-मीमांसा, तत्त्वज्ञान आदी ज्ञाशाखांची मदत घेतली जाते.

वरील विश्लेषणावरून स्त्रीवादी साहित्य-समीक्षा ही अनेकांगी असून तिचा आवाकाही व्यापक असल्याचे दिसून येते.

## १.६ स्त्रीवादी समीक्षा : काही गृहितके :

''स्त्रीवादी समीक्षा ही एक अध्ययन पद्धती आहे. तसेच स्त्री-मुक्ती आंदोलनाची एक राजकीय कृती आहे. ही समीक्षा निश्चित अशा मूल्य दृष्टीतून वाङ्मय व्यवहाराचे वर्णन, विश्लेषण व मूल्यमापन करते.''[२६] पुरूषी वर्चस्वापासून मुक्ती हे ध्येय असल्यामुळे या समीक्षेने साहित्याचे आकलन व मूल्यमापन करण्यासाठी नव्या निकषांची निर्मिती केली. स्त्रीवादी समीक्षेच्या गृहितकांचा गोषवारा थोडक्यात असा -

१) पुरूषसत्ताक मूल्यदृष्टीतून आलेल्या रचनाबंधांना, विचारव्यूहांना छेद देणे, वाङ्मयाचे पुरूषकेंद्री मानदंड, प्रमाणके यांचे पुनर्मूल्यांकन करून नवे मानदंड, नवी मूल्ये निर्माण करणे.

२) इतिहासात दडपल्या गेलेल्या स्त्री लेखिकांचा शोध त्यांची पुनःस्थापना करणे.

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

३) पुरूषनिर्मित साहित्याचे स्त्रीवादी वाचन करणे. पुरूषी मूल्यदृष्टीतून स्त्री-शरीराची प्रतिमा कशी अवतरते, हे अभ्यासणे तसेच पुरूषनिर्मित साहित्यातील दुटप्पीपणा उघड करणे.

४) स्त्रीवादी वाचक तयार करणे. वाङ्‍मयीन संहितेतील स्त्रीपात्रांच्या वाट्याला येणारे दुय्यमत्व व साधन मूलतत्व ओळखण्यास शिकवणे, वाङ्‍मयीन रूपबंधातून, शैली वैशिष्ट्यातून आशयातील स्त्री विशिष्टता कशी वाचावी या विषयी दृष्टिकोन तयार करणे.

५) केवळ स्त्रियांचे म्हणून कोणते आकृतिबंध असू शकतील याचा शोध घेणे आणि त्यांची प्रस्थापना करण्यासाठी पुढाकार घेणे. स्त्रीविशिष्ट अनुभवविश्वाला स्त्री शक्तीचाच एक मूलस्त्रोत मानून त्यांना वाङ्‍मयीन घाटांचा विषय बनविणे.

**स्त्रीवादी साहित्य विविध पंथ :**

साहित्याच्या संदर्भात 'स्त्रीवादा'ची वाटचाल खालीलप्रमाणे पाहाता येईल.

**१) जहाल स्त्रीवाद :**

स्त्रियांचे शोषण करणाऱ्या पुरूषांविरूद्ध आक्रमक लढा देऊन संपूर्ण समाजव्यवस्थाच बदलण्याचा आग्रह धरणारी ही विचारप्रणाली आहे. साहित्यक्षेत्रातही सृजनशीलतेचा मक्ता पुरूषांकडेच आहे. त्याला शह देऊन स्त्रियांच्या मानसिक व वैचारिक विकासाची पुनर्मांडणी करण्यावर ह्या विचारसरणीचा भर आहे. सॅण्ड्रा गिल्बर्ट, सूझन गुबर, हेरॉल्ड बलून, हेलन सिझू, ल्यूरी, इरिमारे यांनी या विचारप्रणालीची सैद्धांतिक मांडणी केली.

विचारणावादी भूमिकेचा आधार घेऊन साहित्यकृतीचे विपरित वाचन करून त्यातील लिंगभेदाची राजकीय आशय खणून काढण्यावर भर दिला. ''पुरूषसत्तेचे केंद्र विचलित करणे त्याला समांतर असे स्त्रीप्रधान केंद्र निर्माण करण्यावर या विचारधारेचा भर आहे.''[२७] पुरूषकेंद्री भाषिक व्याकरण नाकारून स्त्रीकेंद्री संहिता निर्माण करण्याचा प्रयत्न करणे, हे या गटाचे वैशिष्ट्य सांगता येईल.

**२) मवाळ स्त्रीवाद :**

संपूर्ण समाजरचना बदलण्यापेक्षा स्त्रियांना पुरूषांच्या बरोबरीने संधी प्राप्त व्हावी यावर भर देणारी ही विचारप्रणाली आहे.

**३) मूलतत्त्ववादी स्त्रीवाद :**

स्त्रिया या पुरूषापेक्षा अधिक ताकदीने आपले श्रेष्ठत्व सिद्ध करू शकतात. या भूमिकेचा पुरस्कार करणारी ही विचारप्रणाली आहे.

**४) पर्यावरणवादी स्त्रीवाद :**

ही विचारसरणी वनस्पती आणि प्राणी सृष्टीतील सुफलीकरण, प्रजनन, संगोपन व संवर्धन यातील प्राकृतिकतेशी स्त्री शरीराचे सम्यक नाते यावर भर देते. स्त्री धर्माच्या प्राकृतिकतेत अडसर निर्माण करणाऱ्या गर्भपात, गर्भजन परीक्षा इ. अप्राकृतिक कृत्यांविरूद्ध सामाजिक जनजागरण घडवून आणण्यावर भर देणारी ही विचारधारा आहे.

**ब्रिटिश स्त्रीवाद :**

याचा सामाजिक-सांस्कृतिक परिवर्तनावर वा विचारधारेवर अधिक भर आहे. अमेरिकन स्त्रीवादाची उभारणी प्रामुख्याने तेथील विद्यापीठांचे इंग्रजी

साहित्याचे विभाग आणि स्त्री अभ्यास केंद्रातून झाली आहे. याउलट ब्रिटिश स्त्रीवादाची उभारणी विद्यापीठाबाहेरील प्रकाशनसंस्था, वृत्तपत्रे व प्रसारमाध्यमे, राजकारणी कट यातून झालेली आहे. "ब्रिटिश स्त्रीवादी लिंग, आणि वर्ग यातील परस्पर संबंधाच्याविश्लेषणावर भर देतो."[२८]

**फ्रेंच स्त्रीवाद :**

हा अमेरिकन व ब्रिटिश स्त्रीवादाहून निराळा आहे. त्यात भाषिक चिन्ह व्यवस्थेतून अर्थ कसा निष्पन्न होतो यावर भर दिला जातो. पुरूषप्रधान समाजरचनेतील भाषा व्यवहारावरही पुरूषत्वच केंद्रस्थानी असते. पुरूषाचा शब्दम्हणजे कायदा अशी लिंगप्रधान भाषिक सत्ता येथे नांदत असते. त्यामुळे ज्ञान क्षेत्रावर पुरूषसत्ता प्रभाव गाजवीत असते. भाषेवरील ह्या पुरूषकेंद्री आवरणामुळे स्त्रीला प्रकट होण्यास अडसर निर्माण होतो. त्यामुळे स्त्रियांनी दडपणुकीपासून मुक्त असलेली स्त्री विशिष्ट भाषा शोधणे तिला अभिव्यक्त होता येईल असे संभाषित निर्माण करणे यावर फ्रेंच स्त्रीवादाचा भर आहे. हेलन सिझू यांनी गेय भाषा रचून नवी स्त्री-केंद्री भाषिक रचना निर्माण करण्याचा पर्याय सुचविला, तर ॲन रोझलिंड जोन्स हिने स्त्रीचे शरीर हा तिच्या लेखनाचाच मूळ स्त्रोत मानून 'शरीरातून लिहिणे' या संकल्पनेवर भर दिला आहे. स्त्री-साहित्याची भाषा कशी असावी या संदर्भात मोनिका विटिंग म्हणतात, "जी भाषा तुम्ही बोलता ती तुमच्या घशाला, जिभेला, टाळूला, ओठांना विष लावते, ती तुम्हाला नष्ट करण्याऱ्या शब्दांची बनली आहे. ती अशा खुणा चिन्हांची बनविली आहे की त्यांच्या उच्चार केला असता पुरूषांना अभिप्रेत असलेल्या संकेतांनाच व्यक्त केली जाते. वर्चस्व मिळवणाऱ्या प्रवृत्तीची ही भाषा स्त्रीवादी

वाङ्मयाला उपयोगाची नाही. ज्यांना स्पर्श करावयाचा आहे, मिसळायचे आहे, विलीन व्हायचे आहे, स्वतःच्या आणि इतरांच्याही अस्तित्वात आनंदित व्हायचे आहे, त्यांच्याबाबत ती भाषा अधिक प्रवाही आणि लवचित व्हायला अवसरच देत नसते.''[२८] एका अर्थाने या भाषिक नवरचनेतून स्त्री आपल्या स्वतंत्र जगाची नवनिर्मितीच करत असते. अशी फ्रेंच स्त्रीवाद्यांची धारणा आहे.

स्त्रीवादी साहित्याचा अभ्यास करणाऱ्या अभ्यासकाला समीक्षकाला पुढील प्रकारच्या साहित्याचा अभ्यास करता येईल.

**पुरूषप्रधान संस्कृतीने प्रभावित झालेले साहित्य :**

या साहित्यात स्त्रीनिर्मित व पुरूषनिर्मित साहित्याचा अंतर्भाव करता येईल. ''पुरूषप्रधान संस्कृतीने स्त्री-स्वभावाची व स्त्रीत्वाची एक संकल्पना मांडलेली असते. त्यानुसार भावनाशील हळूवारपणा, नाजूकपणा, नम्रपणा, लज्जा, मितहास्य, अबोलपणा, पतिपरायणता आदी स्त्रीच्या स्वभावाचे विशेष किंवा स्त्रीगुण सांगितले जातात हे आपले जन्मजातच स्त्रीगुण आहेत. असे समजून स्त्री त्यांचा स्वीकार करते व ते गुण आपल्या अंगी बाणवून ती त्याप्रमाणे आचरण करीत असते.''[२९] या स्त्रीगुण समुच्चयाला स्त्रीत्व म्हणता येईल. तसेच पराक्रम, धाडस, बुद्धिमत्ता, कणखरपणा-मर्दानीपणा, धीरत्व, आदी गुणांनी युक्त असलेली एक पुरूष स्वाभावाची/पुरूषत्वाची संकल्पना संस्कृतिविरचित असते. ती उपजत वा जैविक नसते.

अशा प्रकारच्या साहित्याची समीक्षा करताना स्त्रीवादी समीक्षक पुरूष मंडित स्त्रीत्वाच्या पुरूषत्वाच्या संकल्पनांचा व मूल्यसरणीचा दंभस्फोट करतात.

## १.६ पुरूषप्रधान संस्कृती व विचारप्रणाली व मूल्यव्यवस्था यांचा प्रतिकार व विरोध करणारे साहित्य :

यात स्त्रीनिर्मित वा पुरूषनिर्मित साहित्याचा अंतर्भाव करता येईल. उदा. 'पण लक्षात कोण घेतो', 'शांतता ! कोर्ट चालू आहे', 'कमला', 'कळ्यांचे नि:श्वास' आदींचा समावेश करता येईल. या साहित्याला 'विद्रोह करणारे स्त्रीवादी साहित्य' म्हणता येईल.

"विद्रोही स्त्रीवादी साहित्याची समीक्षा करताना समीक्षक पुरूषप्रधान विचारप्रणाली व मूल्यव्यवस्था यांचे मूल्यमापन करतो, त्यातील विसंगतीचे दर्शन घडवतो आणि स्त्रीवरील अन्यायांचे स्वरूप विशद करतो. या समीक्षेला 'स्त्रीवादी समीक्षा' असे म्हणता येईल."[३०]

## १.७ स्त्री-निर्मित स्त्री विशिष्ट साहित्य :

स्त्रीकेंद्री समीक्षा विचाराचे व्यवस्थापन 'स्त्रीवादी समीक्षा व्यवहार' स्त्रीत्वाच्या सर्जकतेचा विचार करणारा आहे. ही समीक्षा रूपे स्त्रीचे कनिष्ठत्व नाकारतात. त्या वाटचालीतून स्त्रीकेंद्री समीक्षेची पुढील दोन अंगे उत्क्रांत होत होती.

१) स्त्रीकेंद्री वाचन कसे असावे.

२) संहितेतील चिन्ह व्यवस्थेत स्त्रीवाचक अर्थ स्पष्ट करणे.

स्त्रीकेंद्री समीक्षेपुढे पुढीलप्रमाणे सर्वसाधारणपणे दोन प्रकारची आव्हाने होती.

१) पुरूषसत्ताक संस्कृतीत स्त्रीने केलेल्या लेखनाच्या प्रयत्नांचे विश्लेषण करणे म्हणजे स्त्रीकेंद्री सामाजिक टीका लेखन करणे.

२) स्त्रीकर्केंद्री सौंदर्यशास्त्र विकसित करणे.

ही आव्हाने लक्षात घेऊन हेलन सिझू यांनी स्त्री साहित्याचे स्वरूप कसे असावे याविषयी दिग्दर्शन केले आहे. त्यांच्या मते, स्त्री-साहित्य हे सर्वांगीण एकाच वेळी विकास करणारे असावे स्त्रीचे लेखन अनादी अनंत असावे. तसेच ते अर्थापेक्षा भावगर्भतेच्या जवळ जाणारे स्त्रीत्वाच्या जवळ जाणारे असावे. स्त्री शोक पचवून पुढे जाते. वास्तवतेला स्त्रीकारून स्त्री पुढे जाते. मात करणे हे तिला उमगते या अर्थाने पुरूषांपेक्षा स्त्रियांचे वाङ्मय निराळे असते. कठीण प्रसंगातून आलेल्या अनुभवाने आत्मविश्वासाने ती जेव्हा लिहिते, ते तिचे खऱ्या अर्थाने सामर्थ्य आहे, ताकद आहे यासाठी तिला अगोदर मुक्त व्हावेच लागेल. स्त्रीवादी साहित्यशास्त्राची मांडणी-एलन शोवॉल्टर यांनी प्रथम स्त्रीवादी साहित्यशास्त्राची रूपरेषा मांडली. या मांडणीमुळे १९६० पासून सुरू झालेली स्त्रीवादी समीक्षा 'सेक्सच्युअल पॉलिटिक्स'मधून बाहेर पडली. यांनी समीक्षेचे दोन प्रकार सुचविले.

१) फेमिनाईन क्रिटिक - पुरूषनुगामी साहित्याचे स्त्रीवादीवाचन.

२) गायनोक्रिटिक - स्त्रीसाहित्याची समीक्षा, विश्लेषणाच्या पुरूषानुगामी साहित्याचे स्त्रीवादी वाचन ही स्त्रीवादी समीक्षेची दिशा आहे.

पुरूषप्रधान साहित्यदृष्टी स्त्री चित्रण करताना विरोधाभासांतून स्त्रीप्रतिमेचे एकांगी रूप नाकारतात. त्याचे परखड मूल्यमापन करतात.

स्त्री वाचनाने स्वत:ची वाचन मनोवृत्ती जोपासली तर लिखित साहित्याविषयी नवा दृष्टिकोन तयार होऊन त्याचे नवे स्पष्टीकरण मिळेल. तसेच स्त्रीनिर्मित साहित्य वाचताना त्यातील आशय, संदर्भ, परंपरा, दुसऱ्या स्त्रियांशी, स्त्री समाजाशी जुळविले पाहिजे यातूनच स्त्री-वाचक दृष्टिकोणाची निर्मिती होईल स्त्री समूहनिष्ठ वाचक वर्ग निर्माण करणे हे स्त्रीकेंद्री वाचन आणि स्त्रीकेंद्री लेखन यांचे मुख्य उद्दिष्ट आहे.

## १.८ गायनोक्रिटिसिझम :

स्त्रियांच्या साहित्याचा अर्थ स्त्रीकेंद्री दृष्टी लावणे. विषय, ऐतिहासिकता, शैली, आशय, साहित्यप्रकार, लेखनातील संरचना, स्त्रीची सर्जकता यांचा स्त्रीकेंद्री शोध घेणे होय. शोवॉल्टर यांच्या मते, ‘‘स्त्रीचे म्हणून वैशिष्ट्यपूर्ण अनुभवक्षेत्र असते. ऋतुप्राप्ती व त्याचा शरीर, मानसिक अवस्थांतरांशी असणारा जैविक संबंध स्वत:च्या शरीरात दुसऱ्या जीवाला वाढविण्याचा गर्भधारणेचा वैशिष्ट्यपूर्ण अनुभव, अपत्य संगोपनातील स्तनपानाचा शरीर, मानसिक, देवघेवीचा अनुभव असे स्वशरीरनिष्ठ अनुभवांचे वैविध्य आणि अनुभवसृष्टीचे वेगळेपण आहे. म्हणून पुरूषमन आणि स्त्रीमन यात अंतर पडते. स्त्रियांची शारीरिक, मानसिक वृत्ती ही जन्म देण्याची, दुसऱ्याला स्वत:त सामावून घ्यायची, रूजवण्याची असते. याउलट पुरूषवृत्तीत अहंमन्यतेला आणि महत्त्वाकांक्षेला प्राधान्य असल्यामुळे सत्ता-अधिकार गाजविण्याची प्रवृत्ती असते. शोवॉल्टरने स्त्री साहित्यातील स्त्री विशिष्ट अशा अनुभवांच्या आकलनासाठी पुढील चार प्रकारचे नमुने सुचविले आहेत.’’[३१]

"१) स्त्री शरीरनिष्ठ अनुभवाचे आकलन

२) स्त्रीनिष्ठ मनोविश्लेषण

३) स्त्रीकेंद्री सांस्कृतिक अभिव्यक्तीचे आकलन

४) स्त्रीनिष्ठ सांस्कृतिक अनुभवविश्वाचे अर्थनिर्णयन."[३२]

"स्त्री साहित्याची संहिता, वैशिष्ट्य, आशय, संरचना कथनपद्धती व शैली वैशिष्ट्य यांच्या सूक्ष्मलक्ष्मी अध्ययनासाठी ह्या चार दिशा अतिशय उपयुक्त आहेत. स्त्री साहित्यिकांच्या निर्मिती प्रक्रियेची, कल्पनाशक्तीची व वाङ्मयीन व्यक्तिमत्त्वाचा भेद घेण्यासाठी ही समीक्षा दृष्टी विकसित होणे फार महत्त्वाचे आहे."[३३] तसेच उपयोजित समीक्षेवर भर देऊन नवनवीन स्त्रीवादी वाचनाचे नमुने निर्माण करण्यावरही भर देण्याची गरज आहे.

'क्रिटिकल इन्वायरी' या नियतकालिकात 'फेमिनिस्ट क्रिटिसीझम इन द विल्डरनेस' हा महत्त्वपूर्ण लेख शोवॉल्टरने लिहिला.

ही समीक्षा स्त्रीनिर्मित साहित्याचा इतिहास, साहित्याची शैली, त्यातील विविध आशयसूत्रे, त्यातील साहित्यप्रकार, त्या साहित्याची संरचना आदी विषयांचा अभ्यास करते. तसेच ती लेखिकांचे किंवा स्त्री-साहित्यिकांचे व्यक्तिमत्त्व, त्यांची साहित्यिक कल्पनाशक्ती, त्यांच्या स्त्रीविशिष्ट अशा सर्जकतेचे मानसशास्त्र आदी गोष्टींचा सुव्यवस्थित असा अभ्यास करते. ही समीक्षा प्रामुख्याने साहित्यलक्षी असते. ती सामान्यत: राजकारण निरपेक्ष आहे.

## १.९ स्त्रीवादी समीक्षेचा दुसरा प्रकार :

"हा प्रकार म्हणजे स्त्रीवादी वाचन होय. ही समीक्षा स्त्रीला समजून घेणाऱ्या, तिला न्याय देणाऱ्या, साहित्य वाचनावर भर देते. साहित्याचे हे वाचन

अर्थ विवरण किंवा समीक्षण स्त्रीलक्ष्यी, स्त्रीकेंद्री असते. याचा भर स्त्रीवादी वाचकावर असतो.''[३४]

पुरूषनिर्मित साहित्यात पुष्कळदा संस्कृतीच्या विषमभावी मूल्य दृष्टीतून स्त्रीचे, स्त्री-जीवनाचे चित्रण केले जाते. तसेच पुरूष साहित्यिक हे स्त्री-शरीराची, स्त्री-मनाची, स्त्री-भाषेची व स्त्री-संस्कृतीची स्त्री-विशिष्टता जाणून न घेताच, आपल्या साहित्यातून स्त्री-चित्रण करीत असतात. यामुळे पुरूषरचित साहित्यात स्त्रीचे विकृत व कित्येकदा अज्ञानमूलक असेच चित्रण केले जाते. काही वेळा लेखिकाही पुरूषप्रधान संस्कृतीच्या मूल्य दृष्टीतून स्त्रीजीवनाचे चित्र रंगवीत असतात. त्यामुळे स्त्रीवर अन्याय होतो. अशा प्रकारच्या साहित्यात स्त्रीला अबला, सहिष्णू, पतीच्या पायाची दासी, उपभोगाची वस्तू देवता, क्षणाची पत्नी व अनंत काळाची माता इ. सांस्कृतिक गुणधर्म चिकटवले जातात आणि हे स्त्री-गुण स्त्रीच्या ठायी उपजतच जीवधर्माच्या पातळीवर लाभलेले असतात असे दर्शवले जाते.

अशा प्रकारच्या साहित्याचे, त्यातील स्त्रीप्रतिमांचे वाचन समीक्षण करताना स्त्रीवादी वाचक/समीक्षकाला आपली न्याय बुद्धी जागृत ठेऊन समीक्षण करावे लागते. यादृष्टीने पुरूषप्रधान संस्कृतीतील विषमभावी मूल्य व्यवस्था ही स्त्रीचे लिंग, वंश, वर्ण, वर्ग, आदी भेद व्यवस्थांतून शोषण कशी करते, ती तिच्या स्त्रीत्वाचा, बळी कशी घेते याची परखड चिकित्सा व मूल्यांकन ही समीक्षा करत असते. म्हणून ही समीक्षा साहित्याच्या स्त्रीलक्ष्मी वाचनावर व स्त्रीवादी वाचनावर भर देते.

**सारांश :**

या प्रकरणात स्त्रीवाद म्हणजे काय ? ह्याचे विवेचन करून तदूनंतर स्त्रीवादाच्या अनुषंगाने झालेल्या चळवळीचा विचार थोडक्यात मांडून स्त्रीवादाचा प्रारंभ कुठं व कसा झाला ? भारतीय स्त्रीवादाची वाटचाल, स्त्रीवादी साहित्याची माहिती घेऊन त्यावरील मान्यवर अभ्यासकांची मते लक्षात घेतली. स्त्रीवादी साहित्यातील विविध पंथामध्ये मवाळ स्त्रीवाद, जहाल स्त्रीवाद, मूलतत्ववादी स्त्रीवाद, पर्यावरणवादी स्त्रीवाद, ब्रिटिश स्त्रीवाद, फ्रेंच स्त्रीवाद इ. स्त्रीवादाची थोडक्यात माहिती घेऊन तसेच त्यातील पंथ, समीक्षा विषयक अभयासकाचे दृष्टिकोन या आधारे स्त्रीवादी साहित्य संकल्पना व स्वरूप लक्षात घेतले.

त्यानंतर पुढील प्रकरणात आपण स्त्रियांच्या कथालेखनाचे स्वरूप व विशेष लक्षात घेऊ.

-----

## प्रकरण पहिले

## संदर्भग्रंथ


१) वरखेडे, मंगला : 'स्त्रीवादी समीक्षा: संकल्पना व उपयोजन' का.स.वाणी प्रगत अध्ययन संस्था, धुळे, प्रथम आवृत्ती, १९९९, पृष्ठ क्र.१.

२) भागवत, विद्युत : 'ए रिव्हयू ऑफ द थैअरेटिकल कॉन्ट्रीब्यूशन मेड बाय सम ऑफ द रिसेंट लिडिंग फेमिनिस्ट इन द बेस्ट', थिसीस अनपब्लिशड्, प्रथम आवृत्ती, २००४, पृष्ठ क्र.२५.

३) बॉटमूर टॉप ॲण्ड अदर्स (एडि.) डिक्शनरी ऑफ मार्क्सिस्ट थॉट, ब्लॅकवेल पब्लिशर्स, ऑक्सफर्ड, पृष्ठ क्र.१२.

४) सिमॉन द बोव्हा : 'द सेकंड सेक्स', पृष्ठ क्र.७.

५) साखरे, सीमा : 'स्त्रीवाद', सीमा प्रकाशन, नागपूर, पृष्ठ क्र.९.

६) वरखेडे, मंगला : 'स्त्रीवादी समीक्षा: संकल्पना व उपयोजन' का.स.वाणी प्रगत अध्ययन संस्था, धुळे, प्रथम आवृत्ती, १९९९, पृष्ठ क्र.११.

७) धोंगडे, आश्विनी : 'स्त्रीवादी समीक्षा : संकल्पना आणि स्वरूप', दिलीपराज प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती, १९९३, पृष्ठ क्र. १३.

८) उनि., : पृष्ठ क्र. ११.

९) उनि., : पृष्ठ क्र. १.

१०) उनि., : पृष्ठ क्र. ३.

११) उनि., : पृष्ठ क्र. ५.

१२) उनि., : पृष्ठ क्र. ६.

१३) गेल, ऑम्व्हेट : 'म. जोतिबा फुले आणि स्त्रीमुक्तीचा विचार', पृष्ठ क्र. ४२.

१४) उनि., : पृष्ठ क्र. ४.

१५) उनि., : पृष्ठ क्र. ४.

१६) उनि., : पृष्ठ क्र. ५.

१७) वरखेडे, मंगला : 'स्त्रियांचे कथालेखन : नवी दृष्टी नवी शैली', साकेत प्रकाशन, औरंगाबाद, पृष्ठ क्र.१.

१८) जाधव, रा.ग. : 'निवडक समीक्षा', प्रतिमा प्रकाशन, पुणे, पृष्ठ क्र.३५१.

१९) कुडचेडकर, शिरीन : 'स्त्रीवादी साहित्य समीक्षा','अनुष्टुभ', सप्टें.-ऑक्टो., पृष्ठ क्र.३६.

२०) समन्वयक संपादक राजाध्यक्ष विजया - मराठी वाङ्मय कोश खंड ४, संपूर्ण प्रकाशन, कदंब, पुणे, पृष्ठ क्र. ४०७.

२१) वरखेडे, मंगला : 'स्त्रीवादी समीक्षा: संकल्पना व उपयोजन' का.स.वाणी प्रगत अध्ययन संस्था, धुळे, प्रथम आवृत्ती, १९९९, पृष्ठ क्र.१९८.

२२) कोत्तापल्ले, नागनाथ : 'साहित्याचा अन्वयार्थ', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, पृष्ठ क्र.७३.

२३) Snheja Gunew (ed.) 1991, Page No. 229.


SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

| | | |
|---|---|---|
| २४) गांधी नंदिता/ शाह नंदिता | : | 'स्त्री संघर्षाची रूपे',पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, पृष्ठ क्र. ५. |
| २५) पाटील, गंगाधर | : | 'स्त्रीवादी साहित्य समीक्षा', (अनुष्टुभ) पृष्ठ क्र.३. |
| २६) तत्रैव, | : | पृष्ठ क्र.३. |
| २७) वरखेडे, मंगला | : | 'स्त्रीवादी समीक्षा: संकल्पना व उपयोजन' का.स.वाणी प्रगत अध्ययन संस्था, धुळे, प्रथम आवृत्ती, १९९९, पृष्ठ क्र.११. |
| २८) तत्रैव, | : | पृष्ठ क्र.१३. |
| २९) तत्रैव, | : | पृष्ठ क्र.१३. |
| ३०) पाटील, गंगाधर | : | 'स्त्रीवादी साहित्य समीक्षा', (अनुष्टुभ), पृष्ठ क्र.४. |
| ३१) तत्रैव, | : | पृष्ठ क्र.५. |
| ३२) तत्रैव, | : | पृष्ठ क्र.५. |
| ३३) वरखेडे, मंगला | : | 'स्त्रीवादी समीक्षा: संकल्पना व उपयोजन' का.स.वाणी प्रगत अध्ययन संस्था, धुळे, प्रथम आवृत्ती, १९९९, पृष्ठ क्र.१५. |
| ३४) तत्रैव, | : | पृष्ठ क्र.१६. |

-----